शाहूंच्या आठवणी







प्रा.नानासाहेब साळुंखे

Scanned by CamScanner

शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर

महार जातीतील डॉ. आंबेडकर नामक एका गृहस्थाने उच्चपदवी प्राप्त केल्याची राजर्षी शाहू महाराजांच्या कानावर बातमी येऊन धडकल्यापासून त्यांच्या आनंदाला पारावारच राहिला नाही, जी व्यक्ती महाराजांना भेटावयास येईल त्या व्यक्तीसमोर आंबेडकरांचे तोंड भरून कौतुक करून म्हणावयाचे, "आता या बामणांना बौद्धिक बाबतीत शह द्यावयास बहुजन समाजातील माणसे हळूहळू पुढे येऊ लागली. एक दिवस असा उगवेल की या बामणांपेक्षा आमच्या बहुजन समाजातील माणसेच पुढे गेलेली असतील." महाराजांजवळ बापूसाहेब महाराज बसलेले असायचेच. आंबेडकरांचे चाललेले कौतुक पाहून बापूसाहेब महाराज म्हणाले, "महाराज, एकदा आंबेडकरांना भेटीस तरी बोलवा." महाराज एकदम प्रसन्न होऊन म्हणाले, "बापसाब, अगदी माझ्या मनातलं बोललात बघा."

योगायोगाने त्या ठिकाणी दळवी आर्टिस्ट आले, त्यांना मुंबईची खडान्‌खडा माहिती असल्याने महाराजांनी आंबेडकरांना आमंत्रित करण्याची जबाबदारी सोपविली व त्यांच्या मुंबई प्रवासाची सर्व व्यवस्था करण्याची आज्ञा देऊन महाराज सोनतळीला निघून गेले.

महाराजांच्या आज्ञेप्रमाणे दळवी मुंबईस गेले. डॉ. आंबेडकरांची भेट घेतली. महाराजांचा खास निरोप दिला. पण आंबेडकर कोल्हापुरास यावयास तयार होईनात, कारण संस्थानिकांच्या लहरीपणाच्या अनेक गोष्टी त्यांच्या कानावर आल्या होत्या, अखेर दळवींनी इतर संस्थानिकांपेक्षा शाहू महाराज कसे वेगळे असून अस्पृश्योद्धारासाठी कसे काम करतात, हे सांगितल्यानंतर आंबेडकर कोल्हापुरास यावयास तयार झाले व ते कोल्हापुरला आले.

पहिल्याच भेटीत शाहू महाराज व आंबेडकर यांची मैत्री जमली. मैत्री ही स्फुल्लिंगासारखी असते, ती केव्हा प्रकट होते हे सांगता येत नाही, कित्येक वर्षांच्या सहवासानंतरही प्रकट होत नाही. पण काही-काही वेळी विश्वासाच्या वातावरणाने प्रगल्भता धारण केल्यास एकाच भेटीत ती चिरमैत्री बनून जाते. असेच शाहू महाराज व डॉ. आंबेडकरांच्या मैत्रीचे झाले. एकाच भेटीत चिरमैत्री जमली.

Scanned by CamScanner

पहिल्याच भेटीत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्योद्धाराकरिता एका निदान साप्ताहिकाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन आपण 'मूकनायक' हे साप्ताहिक चालवित असलो तरी आज ते आर्थिक अडचणीमुळे 'मूक' झाल्याचे सांगितले. 'मूकनायक' विषयी अधिक माहिती देताना आंबेडकरांनी महाराजांना सांगितले, ''आपण ३१ जानेवारी, १९२० ला मूकनायकचा पहिला अंक प्रकाशित केला. या अंकावर संत तुकाराम यांचे बोधवाक्य आहे, हे बोधवाक्य असे आहे,

''काय करू आता धरूनिया भीडा नि:शंक हे तोंड वाजविले ।

नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण, सार्थक लाजून नव्हे हित ।''

संत तुकाराम यांचे बोधवाक्य ऐकून महाराज एकदम प्रसन्न होऊन, ''व्वा, व्वा! छान ! छान !!'' असे सहजच म्हणून गेले.

आंबेडकरांनी महाराजांना आर्थिक अडचणीमुळे वृत्तपत्रे कशी बंद पडतात हे सांगत असतानाच सोमवंशीय मित्र, हिंदू नागरिक, विटाळ विध्वंसक यांची उदाहरणे दिली. तसेच त्यांची कारणेही सांगितली. त्या काळी वृत्तपत्रांना फारशा जाहिराती मिळत नसत. वर्गणीदारांच्या वर्गणीवरच अंक चालवावा लागत असे आणि वर्गणीदार आपल्या वर्गणीशी प्रामाणिक राहत नसत. महाराजांच्या ध्यानी सर्व बाबी आल्यानंतर तात्काळ त्यासाठी रु. २,५०० ची भरघोस मदत केली. या मदतीनंतर 'मूकनायक' बोलू लागला.

२० मार्च, १९२० रोजी करवीर राज्यातील 'कागल' जहागिरीतील 'माणगाव' या ठिकाणी अस्पृश्यांची पहिली ऐतिहासिक भव्य परिषद शाहू महाराजांच्या आर्थिक मदतीतून व प्रेरणेने आयोजित केली गेली होती. या परिषदेचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देण्यात आले होते, त्यावेळी मार्गदर्शन करताना भाषणाच्या सुरूवातीस शाहू महाराजांनी आंबेडकरांचा उल्लेख 'माझे प्रिय मित्र आंबेडकर' असा करताच हजारो दलितांनी महाराज व आंबेडकर यांचा अखंड जयघोष करीत, टाळ्यांचा पाऊसच पाडला. प्रत्यक्ष छत्रपती आंबेडकरांना 'प्रिय मित्र' म्हणतात याचे त्यांना कौतुकच वाटले. भाषणाच्या शेवटी आंबेडकरांना आग्रहाचे भोजनाचे आमंत्रण देताना म्हणाले, ''आंबेडकरांना माझी विनंती आहे की, त्यांनी जाण्यापूर्वी [illegible] माझे रजपूतवाडीच्या कॅम्पवर माझ्याबरोबर भोजनाला येण्याची तसदी द्यावी.'' महाराजांच्या आमंत्रणाचा स्वीकार करून आंबेडकर सोनतळीला आले.

Scanned by CamScanner

भोजनाच्या वेळी महाराजांनी स्वत: आग्रह करून त्यांना यथेच्छ भोजन करावयास लावले. त्यानंतर आंबेडकर आगगाडीने मुंबईस जाणार होते, त्यावेळी महाराजांनी स्वत: स्टेशनवर येऊन त्यांना निरोप दिला.

डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या नेतृत्वामुळे दलित उद्धाराच्या चळवळीला निर्णायक उभारी आली. शाहू महाराजांनी तर निश्चयच केला होता की, ''माझे राज्य गेले तरी बेहत्तर अस्पृश्योद्धाराचे कार्य थांबविणार नाही.'' महाराजांच्या अशा कार्यामुळे अस्पृश्य लोक शाहूंना आपला त्राता, उद्धारक, मित्रच नव्हे तर प्रत्यक्ष देव मानीत होते. दिवसेंदिवस महाराज व आंबेडकर यांचा स्नेह वाढत गेला. स्नेह वाईट नसतो, कारण तो माणसाला त्याग करावयास शिकवितो, संकुचित नात्याची सीमा तो पार करतो, असेच दोघांच्या स्नेहाच्या बाबतीत घडत गेले. खरी मैत्री ही मोकळ्या हृदयाने बोलत असते, केव्हाही मदत करण्यास तयार असते.

४ सप्टेंबर १९२१ रोजी लंडनहूनआंबेडकरांनी महाराजांना एक पत्र पाठवून मदत मागताना ते लिहितात,"I Need about 200 pounds to tide over my difficulties, I would be very much obliged if Your Highness can see your way to help me with a loan of that amount." तर पत्राच्या शेवटी आंबेडकर म्हणतात "I hope Your Highenss is enjoying ood health. We need you ever so much, For you are the pillar of that great movement towards social democracy which is making its headway in India."

(आपली प्रकृती उत्तम असेलच, अशी आशा आहे. आपली आम्हाला खूप आवश्यकता आहे, कारण भारतात प्रगती करीत असलेल्या सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे आपण एक महान आधारस्तंभ आहात.) आंबेडकरांना महाराजांविषयी किती आदर होता, यावरून दिसून येते.

आंबेडकरांच्या विनंतीप्रमाणे, त्यांना आपली आवश्यक 'फी' भरण्यासाठी हवे असलेले २०० पौंड महाराजांनी त्वरित पाठविले.

त्यानंतर पुढे काही दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी, १९२२ रोजी लंडनहून डॉ. आंबेडकरांचे महाराजांना पुनश्च मदत मागताना पत्र आले, त्या पत्रात ते म्हणतात, ''मला परत येण्यास अवधी लागणार असल्यामुळे घरी खर्चाची अडचण होणार आहे. तरी हुजुरांनी कृपावंत होऊन रु. ७५०/- मदत केल्यास मी अत्यंत ऋणी होईन. आजवर जे अनेक उपकार हुजुरांनी केलेत, त्यात हाही करतील अशी

Scanned by CamScanner

आशा आहे.''

या पत्राप्रमाणे शाहू महाराजांनी पत्र मिळताच मनिऑर्डरने सातशे पन्नास रुपये पाठवून देण्याची व्यवस्था केली.

डॉ. आंबेडकरांना महाराजांविषयी नेहमीच आदरभाव असे. उच्च जाती आपल्या स्वार्थासाठी ब्राह्मणेतर व बहिष्कृत यामध्ये कधीही एकी न निर्माण होता बेकीच राहावी यासाठी प्रयत्नशील होती, तशा प्रकारे ते हीन डावपेच खेळत, प्रत्येक वेळी शाहू महाराज ते डावपेच आपल्या मुत्सद्देगिरीच्या बळावर उधळून लावीत. याबाबत २२ सप्टेंबर १९२० च्या 'मूकनायक' मध्ये 'प्रेम की सूड' या लेखात आंबेडकर म्हणतात, ''या विसाव्या शतकातील स्वयंनिर्णयाच्या काळात राजर्षी श्रीमन्महाराज शाहू छत्रपती यांनी ब्राह्मण जातीकडून नाडवलेल्या ब्राह्मणेतर व बहिष्कृत वर्गाच्या चळवळीचा पुरस्कार केल्यावर बहुजन समाजाकडून त्यास मिळत असलेला धन्यवाद ब्राह्मण या जातीस न खपून त्यांनी बहिष्कृत व ब्राह्मणेतर या वर्गात खुद्द मराठ्यात फूट पाडण्याचा अत्यंत घातक असा उपक्रम चालविला आहे.''

आंबेडकर व शाहू महाराज एकमेकांचा आदर करीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे,दिल्ली येथे १३ व १४ फेब्रुवारी, १९२२ रोजी 'अखिल भारतीय बहिष्कृत परिषद' आयोजित केली होती. त्या परिषदेत आंबेडकरांच्या अनुपस्थितीत त्यांच्या माघारी त्यांच्याविषयी प्रशंसोद्गार काढताना शाहू महाराज म्हणाले होते, ''भीमराव आंबेडकर हे तुमचे महान नेते आहेत त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवा, त्यांचे अनुकरण करा व त्यांच्यासारखे होण्याचा प्रयत्न करा. मी तर तुमच्या सेवेला वाहून घेतले आहे. मला तुमची सेवा करू द्यावी ही विनंती.''

आंबेडकर अस्पृश्यता निर्मूलन व त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन फंड' संस्था उभी करणार होते, या संस्थेत शाहू महाराजांनी कोणत्याही लहानमोठ्या पदावर काम करण्याची त्यांनी आंबेडकरांना रूकडी (कोल्हापूर) येथून दि. ७ जून, १९२० रोजी लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते.

''चांगला मनुष्यच चांगला मित्र होऊ शकतो.'' हे उभयंतांच्या मैत्रीवरून स्पष्ट होते.

Scanned by CamScanner